Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

VOL- XII ISSUE- VIII AUGUST 2025 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.379 ISSN 2349-638x

# भाषा विषयातील अप्रगत विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा कृती कार्यक्रम विकसन व परिणामकारकता - एक अभ्यास

**हिनाकौसर बालनसाब पटेल**
संशोधक विद्यार्थी,
शिक्षणशास्त्र संकुल
स्वा.रा. ती. म विद्यापीठ, नांदेड

**डॉ. जी.टी.खुरपे**
प्राचार्य,
मायणी भाग शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा

**प्रस्तावना:**

भाषा हे विचार करण्याचे संवादाचे, नव्या बाबी शिकण्याचे साधन आहे. जगातील कोणतीही भाषा शिकावयाची म्हणजे श्रवण, भाषण, वाचन व लेखन ह्या क्षमता आल्याच पाहिजेत. किंबहुना याच क्रमाने भाषा शिकली जाते असे नाही की श्रवणाला कमी महत्त्व आणि वाचन लेखनाला अधिक असे झाले तर भाषिक विकास होणारच नाही याकरिता भाषिक क्षमता जाणून घेतले पाहिजे. शासनाने बालकाचे मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 लागू केला आहे. त्यात 6 ते 14 वयोगटातील प्रत्येक बालकास प्राथमिक शिक्षण हे मोफत देणे सक्तीचे व बंधनकारक केले आहे. याची अंमलबजावणी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 नुसार ज्ञानरचनावादाचा स्वीकार केला आहे. शिक्षण क्षेत्रातील हे परिवर्तन प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी आवश्यक आहे. हे ओळखून महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात अभूतपूर्वक क्रांतिकारक बदलांसाठी अधिनियमाची अंमलबजावणी 01 एप्रिल 2010 पासून संपूर्ण देशात सुरू झाली आहे. म्हणून सदरील समस्येवर संशोधनामध्ये भाषा विषयातील अप्रगत विद्यार्थ्यांच्या क्षमतांच्या प्रमुख अडचणींचा शोध घेणे महत्त्वाचे ठरेल. लातूर जिल्ह्यातील भाषा विषयातील अप्रगत विद्यार्थ्यांचा अभ्यास करण्यात आला.

## 1. समस्या विधान:

भाषा विषयातील अप्रगत विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा कृती कार्यक्रम विकसन व परिणामकारकता एक अभ्यास

## 2. संशोधनाची उद्दिष्टे:

1. भाषा विषयातील अप्रगत विद्यार्थ्यांचा शोध घेणे.
2. भाषा विषयातील अप्रगत विद्यार्थ्यांच्या मुख्य भाषिक क्षमतांचा शोध घेणे.

## 3. संशोधनाची गृहीतके:

भाषा विषयातील अप्रगत विद्यार्थ्यांमध्ये क्षमता पूर्णत: विकसित झालेल्या नाहीत.

## 4. संशोधन साधन:

सदरील संशोधनात विद्यार्थ्यांसाठी स्वनिर्मित प्रश्नावली वापरण्यात आली.

## 5. संशोधन पद्धती:

- सदरील संशोधनात सर्वेक्षण व प्रायोगिक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.
- सदरील संशोधनात न्यायदर्श म्हणून लातूर जिल्ह्यातील 10 शाळेतील 30 विद्यार्थ्यांकडून प्रश्नावली भरून घेतली.

## 6. संशोधन मर्यादा:

- सदरील संशोधन लातूर जिल्ह्यातील 10 शाळा पुरतेच मर्यादित आहे.
- सदरील संशोधन भाषा विषयातील अप्रगत विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.

## 7. संशोधनाची गरज:

"शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो कोणी हे प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही' असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले त्यासाठी विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले पाहिजे, समाजातील कुठलाही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही. म्हणून प्रस्तुत संशोधनाची

अत्यंत गरज संशोधकाला वाटते. कारण संशोधक हा शैक्षणिक परिवेशांमध्ये वास करीत आलेला आहे. प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी व मी स्वतः शिक्षिका असल्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना उद्भवणाऱ्या समस्या वारंवार अनुभवल्या आहेत. या सर्व बाबींचा परिपाक म्हणून हा विषय संशोधनासाठी घेण्याची गरज वाटली.

## 8. संशोधन महत्त्व:

शिक्षण हा मानवाचा तिसरा डोळा आहे असे म्हटले जाते. कारण शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो. हा विकास होत असताना तो विकास हा संकुलित होणे अत्यंत महत्त्वाचे असते. कारण समाजामध्ये आपल्या स्वतःचे योग्य प्रकारे समायोजन करू शकतो व त्याची वाढ व विकास होत असताना फक्त शरीराचा विकास होऊन चालत नाही, तर त्याच्या मानसिकतेचा विकास होणे गरजेचे असते त्यामुळे विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिक विकास समतोल पद्धतीने झाला पाहिजे तेव्हा तो विद्यार्थी आपल्या बुद्धी चातुर्याने समाजामध्ये समायोजन साधू शकतो हे सर्व होण्यासाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या योजनेअंतर्गत सर्व घटकांचा संतुलित विकास झाला पाहिजे. म्हणून वेगवेगळ्या माध्यमातून प्रयत्न होत आहेत. त्यानंतर अप्रगत विद्यार्थ्यांसाठी कृती कार्यक्रम देऊन त्या अंतर्गत अप्रगत विद्यार्थ्यांसाठी कृती कार्यक्रम देऊन प्रगत करण्याची गरज वाटते.

## 9.विश्लेषण:

सदरील संशोधनासाठी शेकडेवारी हे विश्लेषण तंत्र वापरले आहे.

## 10. संशोधन निष्कर्ष:

- कृती कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या श्रवण, भाषण, वाचन व लेखन या चार ही कौशल्यत सुधारणा दिसून आली.
- उपक्रमांच्या पुनरावृत्ती मुळे शब्द संपत्ती वाढली तसेच व्याकरणातील मूलभूत चुका कमी झाल्या.
- सतत अभिप्राय, प्रात्यक्षिक उपक्रम खेळाच्या पद्धतीने केलेले अध्यापन सर्वाधिक परिणामकारक ठरते.

## 11. कृती कार्यक्रम घेण्यासंदर्भात:

- कृती कार्यक्रम घेताना स्पष्ट उद्दिष्ट निश्चित असणे वास्तववादी योजना आखावी.
- कृती कार्यक्रम घेताना आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून घ्यावी.
- सहभागी विद्यार्थ्यांची प्रेरणा वाढवावी.
- शिक्षकांच्या जबाबदाऱ्या निश्चित करून वेळेचे काटेकोर पालन करावे.

## 12. संशोधन शिफारशी:

- भाषिक संकल्पना शिकवताना खेळ, नाटिका, गाणी, चित्रकथा भूमिका, निवेदन वापरावीत.
- भाषा शिकवताना शैक्षणिक भ्रमणध्वनी उपयोजने, ई लर्निंग साहित्य, ऑडिओ-व्हिडिओ साधने याचा वापर करावा.
- अप्रगत विद्यार्थ्याला वेगळा वेळ द्यावा व वाचन, लेखनाच्या छोट्या छोट्या कृती घ्याव्यात.

## 13. संदर्भ ग्रंथ सूची:

1. मैत्री ज्ञानरचनावादाशी- राजश्री बाम व शीला कोलाटकर, निराली प्रकाशन, पुणे-13.
2. शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे मुळे, उमाटे, श्री विद्या बुक्स प्रकाशन, औरंगाबाद 1998.
3. प्राथमिक अभ्यासक्रम, 2004 MSCERT, पुणे.
4. कृती संशोधन मार्गदर्शिका, 2012 MSCERT, पुणे.
5. कुमठे बीटचा रचनावादी प्रवास, प्रतिभा भराडे, MSCERT, पुणे - 2016.
6. प्रत्येक शाळेसाठी शाळेतील प्रत्येकासाठी रचनावाद, पाटेकर ए.एच. MSCERT पुणे 2016.
7. ज्ञानरचनावाद - जाधव एच. व्ही. संजीवनी प्रकाशन, सातारा 2015.
8. रचनावाद समजून घेताना, तृप्ती अंधारे, MSCERT, पुणे 2016.
9. अध्यापक नवे शिल्पकार, दत्तात्रेय तापकीर, MSCERT, पुणे 2016.
10. शिकूया शिकवू या दडपणाविना, पठाण यु.जी. MSCERT, पुणे 2016.
11. शोध प्रस्तावाचा दिशा प्रगतीच्या, जयस्वाल. एस. पी. MSCERT